# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 20.08.2025** **वार- बुधवार**

---

**पाणी**

खडकवासला धरणातून आज सकाळी मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात आल्यामुळं पुणे शहरातील नदीकाठच्या वस्त्यांमध्ये पाणी शिरलं. 194 कुटुंबातील 729 नागरिकांना  सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं.  दुपारनंतर पावसाचा जोर ओसरल्यानं पाण्याचा विसर्ग कमी करण्यात आला आहे.

**पिंचि**

पिंपरी चिंचवड शहरातून वाहणाऱ्या नद्यांवरील धरणांमधून करण्यात येणाऱ्या विसर्गामुळं नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वतीनं क्षेत्रीय कार्यालय स्तरावर आपत्ती व्यवस्थापन कक्षांद्वारे पूर नियंत्रण परिस्थिती हाताळली जात आहे. महापालिकेनं काल रात्रीपासूनच पुरानं बाधित झालेल्या भागातील अंदाजे ९५० नागरिकांना निवारा केंद्रांमध्ये तसंच महापालिकेच्या शाळांमध्ये स्थलांतरीत केलं आहे.

**एमकेसीएल**

भविष्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकण्डक्टींग आणि सिलिकॉम या तीनही तंत्रज्ञानामध्ये आवश्यक असणारं मनुष्यबळ आपल्याकडे भरपूर असून ते बळकट करण्याचं काम केलं तर या तीनही क्षेत्रात

आपण वर्चस्व गाजवू शकतो असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. एमकेसीएल म्हणजे महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या रौप्य महोत्सवी स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे आणि एमकेसीएलचे अध्यक्ष डॉक्टर अनिल काकोडकर, संस्थापक डॉक्टर विजय भटकर इत्यादि मान्यवर उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार याप्रसंगी बोलताना म्हणाले की, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात एमकेसीएलनं ज्ञानाची मशाल पेटवण्याचं काम केलं आहे.

**<u>पुल</u>**

पुणे विद्यापीठ चौकातील एकात्मिक दुमजली उड्डाण पुल प्रकल्पाचं लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज होत आहे.

**<u>पिके</u>**

राज्यात सर्वदूर होत असलेल्या जोरदार पावसामुळं खरीप हंगामातील सुमारे पाच लाख पन्नास हजार हेक्टरवरील पिकांना फटका बसला आहे. त्यामध्ये नांदेड जिल्ह्यातच सर्वाधिक म्हणजे दोन लाख 60 हजार हेक्टरवरील पिकं बाधित झाली असल्याची माहिती कृषी आयुक्तालयातून देण्यात आली.

**<u>लंपी</u>**

लंपी चर्मरोगाच्या अनुषंगानं पशुपालकांनी घाबरून जाऊ नये; उर्वरित जनावरांचं लसीकरण करून घ्यावं असं आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉक्टर प्रवीणकुमार देवरे यांनी केलं आहे. राज्यातील एकंदर गोवंशीय पशुधनाच्या तुलनेत लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव अत्यल्प असल्याचं त्यानी सांगितलं. ८ हजार ३३० जनावरं उपचारानंतर बरी झाली आहेत. तर आतापर्यंत ४०३ जनावरांचा मृत्यू झाला आहे. राज्यात ९३ टक्केपेक्षा जास्त गोवंशीय पशुधनाचं लसीकरण पूर्ण झालं असल्याचं देवरे म्हणाले.

**शेलार**

राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव जागतिक पातळीवर नेण्याकरिता सर्वांनी मिळून काम करावं, असं आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री  आशिष शेलार यांनी आज पुण्यात एका बैठकीत केलं. यावर्षीच्या गणेशोत्सवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील प्रसंग, ऑपरेशन सिंदूर, स्वदेशी वस्तूंचा वापर, युनेस्कोच्या वारसा स्थळ यादीतील १२ गडकिल्ले, पर्यावरण आदी विषयावर जनजागृती करण्याकरिता गणेश मंडळांना प्रोत्साहन द्यावं, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान करुन त्यांच्या कर्तृत्वावर आधारित माहिती फलक लावावेत. मंडळांनी प्रशासनासोबत समन्वय ठेवून हा गणेशोत्सव शांतता आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करावा, असं आवाहन शेलार यांनी केलं.

**व्याख्यान**

पुण्यातील इंडी हेरीटेज आणि बेलवलकर सांस्कृतिक मंचाद्वारे 'मास्टर क्लास'  उपक्रमांतर्गत भारतीय मुर्तीशास्त्र या विषयावरील तज्ज्ञ डॉक्टर गो. बं. देगलूरकर यांचं 'गणेश मूर्ति'  या विषयावरील व्याख्यान शनिवारी  २३ ऑगस्टला सकाळी १० वाजता भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरात निःशुल्क आयोजित करण्यात आलं आहे. प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्वावर प्रवेश दिला जाईल.

**स्वयंसेवी**

शासन, प्रशासन आणि सर्वसामान्य जनता यांच्यातील दुवा म्हणजे  स्वयंसेवी संस्था असून समाज सक्षम होण्यात त्या मोलाचं योगदान देत असल्याचं आदर्श ग्राम योजनेचे अध्यक्ष, पोपटराव पवार यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. महाराष्ट्र एनजीओ समितीच्या वतीनं पुण्यात आयोजित राज्यस्तरीय अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी पवार आज बोलत होते.

**राजीव**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सद्भावना दिनानिमित्त माजी पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी यांना अभिवादन करण्यात आलं. यानिमित्त कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर सुरेश गोसावी आणि वित्त आणि लेखा अधिकारी सीएमए चारुशीला गायके यांनी गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. याप्रसंगी उपस्थितांनी जात, वंश, धर्म, प्रदेश, किंवा भाषा विषयक भेद न करता भावनिक ऐक्य आणि सामंजस्यानं काम करण्याची शपथ घेतली.

**<u>जैन</u>**

जैन धर्मियांच्या पवित्र पर्युषण पर्वाला आजपासून सुरुवात झाली. सात दिवस चालणाऱ्या या पर्युषण पर्वामध्ये पुणे शहरातील विविध स्थानक आणि मंदिरांमध्ये धार्मिक उपक्रम राबवले जाणार आहेत.

**<u>गोल्डरश</u>**

जगविख्यात चित्रपट अभिनेते आणि दिग्दर्शक चार्ली चॅप्लिन यांच्या 'द गोल्ड रश' या चित्रपटाच्या शताब्दीनिमित्त दाखवण्यात आलेल्या या चित्रपटाला पुण्यात प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला. १९२५ साली प्रदर्शित झालेला हा चित्रपट आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्यानं फोर-के रिस्टोर्ड आवृत्तीमध्ये सादर करण्यात आला. विनोदी शैलीतून सामाजिक संदेश देणारा आणि चार्ली चॅप्लिन यांचा मास्टरपीस ठरलेला हा चित्रपट मोठ्या पडद्यावर पाहण्याचा अनुभव प्रेक्षकांसाठी अविस्मरणीय ठरला.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**